सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. 39
दि. १५/६/२०२१

महाराष्ट्र शासन राजपत्र, असा., नोव्हेंबर १८, २००५/कार्तिक २७

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. २५/२०२१
दिनांक:- १५/ ६ /2021

जोडपत्र अ
(नियम ३ पहा)

माहितीचा आधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना

प्रति,
राज्य जन माहिती आधिकारी
(कार्यालयाचे नांव व पत्ता) सामान्य प्रशासन विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (पश्चिम)

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आश्विन ल. पाटील.
२. पत्ता : B-201, न्यू महादेव पार्क, A-विल्डींग काशी नगर, भाईंदर (पूर्व) Mob:- 9222111309

३. हव्या असलेल्या माहितीचा तपशील :

(एक) माहितीचा विषय — विशेष महासभेच्या ठरावाची प्रत मिळणे बाबत.

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी — 1 फेब्रु. 2018 ते 31 मार्च 2018

(तीन) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन — मिरा-भाईंदर महानगरपालिका विशेष महासभा दि. 20/02/2018 रोजीचे ठराव क्र. 6 मधील आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे व तांत्रिक प्रमाण पत्रा सह. यांची छायांकित पत्र देण्यात यावी.

(चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यक्तिशः हवी आहे — व्यक्तीशः!
(प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल)

(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास,
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे
(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडावी)

ठिकाण :
दिनांक : 16/06/2021

अर्जदाराची सही / अंगठा

01 C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२७/2021

दिनांक :- ९८/ ६ /2021

प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी,
सार्व. बांधकाम विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.</u>
मा. विशेष महासभा ठराव क्रमांक 68 ची प्रत व इतर कागदपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. अश्विन एल. पाटील यांचेकडील दि. 16/06/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (नगरसचिव कार्यालयास प्राप्त दिनांक 17/06/2021)

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये अर्जदार यांनी मा. विशेष महासभा ठराव क्रमांक 68 ची प्रत व आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्र व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केलेली आहे. ठराव क्र. 68 हा लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्तावित कामास मान्यता तेणेबाबतचा आहे. उक्त प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असल्याने, अर्जदारांस आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्र व तांत्रिक प्रमाणपत्रांबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी, संदर्भित पत्राची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यात येत असून, कृपया अर्जदारांस आवश्यक माहिती आपल्या स्तरावर परस्पर देण्यात यावी ही विनंती.

कळावे.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

प्रत :-
श्री. अश्विन एल. पाटील,
बी-201, न्यु महादेव पार्क A बिल्डींग,
काशिनगर, भाईंदर (पूर्व),
ठाणे - 401 105

पोच

२१/६/२१
लिपीक
सार्वजनिक बांधकाम विभाग
मिरा-भाईंदर महानगर पालिका

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Ashvin Patil.docx

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२७/2021

दिनांक :- २१/६ /2021

प्रति,
श्री. अश्विन एल. पाटील,
बी-201, न्यु महादेव पार्क A बिल्डींग,
काशिनगर, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
मा. विशेष महासभा ठराव क्रमांक 68 ची प्रत व इतर कागदपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 16/06/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
(नगरसचिव कार्यालयास प्राप्त दिनांक 17/06/2021)

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मा. विशेष महासभा ठराव क्रमांक 68 ची साक्षांकित प्रत व आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्र व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस मा. विशेष महासभा दि. 20/02/2018, ठराव क्र. 68 ची साक्षांकित प्रत या सोबत उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 02)

मा. विशेष महासभा ठराव क्रमांक 68 हा सार्व. बांधकाम विभागाशी निगडीत असून, आपल्या पत्रात नमुद प्रमाणपत्र व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या प्रती आपणांस परस्पर उपलब्ध करुन देणेसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./27/2021, दि. 18/06/2021 अन्वये जनमाहिती अधिकारी, सार्व. बांधकाम विभाग, मि.भा. मनपा यांचेकडे संदर्भित पत्राची छायांकित प्रत वर्ग केलेली आहे. तरी सदर माहिती आपण त्यांचेशी संपर्क साधून परस्पर घ्यावी ही विनंती. (संदर्भास्तव सोबत पत्राची प्रत जोडून देत आहोत)

आपणांस देण्यात आलेली ठरावाची प्रत नगरसचिव विभागाच्या अभिलेखी असलेल्या मुळनस्तीवरुन देण्यात आलेली आहे. सदर माहितीबाबत आपणास आणखी विचारणा करावयाची असल्यास कृपया माझ्याशी प्रत्यक्ष अथवा भ्रमणध्वनी क्र. 9967481732 वर संपर्क साधावा.

तरीही आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

pc 2Z:\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Ashvin Patil.docx

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.20/02/2018

**प्रकरण क्रमांक ( 70 ) :-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्तावित कामास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्रमांक. ( ६८ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन 2017-18 या वर्षासाठी अनुदान प्राप्त होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. अनुसुचित जातीच्या वस्तीमधील नागरीकांचे राहणीमान व स्तर उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना मुलभुत सोयी पुरविणे आवश्यक आहे. सदर योजनेतंर्गत शासनाकडून 100% रक्कम अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेत वॉर्ड क्र.12,13,14 ह्या मध्ये अनुसुचित जातीचा प्रवर्ग असून सदर वॉर्डातील खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | काजुपाडा केसरी पाडा येथे अंगणवाडी बांधणे. | रु.15,00,000/- |
| 2. | काजुपाडा केसरी पाडा येथे कल्वर्ट बांधणे. | रु.18,00,000/- |
| 3. | काजुपाडा शंभर पाडा येथे विहीर बांधणे. | रु.10,00,000/- |
| 4. | काजुपाडा शंभर पाडा कल्वर्ट बांधणे. | रु.20,00,000/- |
| 5. | काजुपाडा शंभर पाडा अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.24,00,000/- |
| 6. | काजुपाडा केसरीपाडा येथील अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.24,00,000/- |
| 7. | ठाणे घोडबंदर ते शंभर पाडा पर्यंत रस्ता बनविणे. | रु.20,00,000/- |
| 8. | घोडबंदर गाव येथील समाज मंदीराची पुर्न: बांधणी करणे. | रु.24,00,000/- |
| 9. | बाभळीचा भाट येथील समाजमंदीराची पुर्न: बांधणी करणे. | रु.24,00,000/- |
| 10. | घोडबंदर गाव ते घोडबंदर स्मशानभुमी पर्यंत सी.सी.रस्ता बनविणे. | रु.20,00,000/- |
| 11. | काजुपाडा केसरीपाडा येथे स्मशानभुमी बनविणे. | रु.15,00,000/- |
| 12. | शंभर पाडा येथे समाजमंदीर बांधणे. | रु.15,00,000/- |
| 13. | घोडबंदर गाव दत्त मंदीर ते रेतीबंदर पर्यंत गटार बांधणे. | रु.24,00,000/- |
| 14. | बाभळीचा भाट अंतर्गत सी.सी.रस्ते करणे. | रु.20,00,000/- |
| 15. | काशिगाव आदर्श विदयामंदीर ते मुख्य नालापर्यात नवीन गटार बांधणे. | रु.24,00,000/- |
| 16. | काजुपाडा केसरी पाडा येथील नाला बांधणे. | रु.24,00,000/- |
| 17. | प्रभाग क्र 13, घोडबंदर, मॉडर्न झोपडपट्टी येथील लहुजी मंदीर ते कपाडिया कंपाऊड पर्यंत गटार व नाला बांधणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.43,03,100 |
| 18. | प्रभाग क्र 13,घोडबंदर वामनदेव नगर येथील मुख्य रस्ता | रु.31,48,700 |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | ते कपाडिया कंपाऊड पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | |
| 19. | घोडबंदर येथील साईनाथ सेवानगर परीसरातील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.10,63,600 |
| 20. | घोडबंदर येथिल नेहरुनगर व एम.टी.डी.सी. बंगला परीसरातील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, गटारे दुरुस्ती करणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.23,10,700 |
| 21. | घोडबंदर येथील हनूमान परिसरातील अंतर्गत रस्ते, कॉंक्रीटीकरण करणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.18,60,700 |
| 22. | काशीगाव प्रभाग क्र 13 मधील भाजीमार्केट रस्त्यावर गटार बांधून स्लॅब टाकणे व चेकर्ड लाद्या बसविणे. | रु.44,55,850 |
| 23. | काशीगाव येथील बी.एम.एस. हायस्कूल ते काशिमिरा नाका पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु.23,25,200 |
| | **एकुण** | **रु.5,15,67,850/-** |

वरील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती योजनेतंर्गत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून "दलित वस्ती निधी" अंतर्गत खालील प्रमाणे मंजूर करण्यात आलेली होती.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) प्रभाग क्र.27 राधास्वामी गेट क्र.01 समोर नाल्याचे बांधकाम करणे | रू.49,80,400/- |
| 2. | भाईंदर (प.) प्रभाग क्र.27 तोडी बंगल्या समोर नाल्याचे बांधाकाम करणे | रू.49,85,600/- |
| 3. | भाईंदर (प.) प्रभाग क्र.27 भोलानगर समोर, राधास्वामी रस्त्यासमोर नाल्याचे बांधकाम करणे | रू.49,54,000/- |

तथापी सदर कामांच्या निविदा मंजूर झाल्या असून सदर कामे दलित वस्ती सुधारण योजनेतून न घेता "गटारे / नाले बांधकाम" या लेखाशिर्षकातून करण्यात यावीत. सदर कामांच्या बदल्यात वरीलपैकी कामे पाठवुन मान्यता घेण्यात यावी.

सुचक :- श्री. दीपक गजरे

अनुमोदन :- श्रीम. [illegible] नाईक

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका